| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | **2025**<br><br>**CB/ 41/2025** |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक ११.०७.२०२५** |

**प्रेसनोट**

**JIO कंपनीच्या मोबाईल टॉवरचे 5 G BASEBAND UNIT चोरी करणाा-या संघटीत टोळीतील ०४ गुन्हेगारास अटक करून १३ गुन्हे उघड व ५६ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत**

---------------------------------------------------------------------------------

श्री.मिलींद भांरबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे,पोलीस सह आयुक्त, श्री.दिपक साकोरे,अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये JIO कंपनीच्या मोबाईल टॉवरचे 5 G BASEBAND UNIT चोरी होउन मोबाईल नेटवर्कमध्ये बाधा येऊन नागरिकांना मोबाईल नेटवर्कची असुविधा होऊ नये याकरीता लवकरात लवकर गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले.

दिनांक:-२६/०६/२०२५ ते दि.०६/०७/२०२५ या कालावधीत खांदेश्वर,तळोजा, पनवेल परिसरात JIO कंपनीच्या मोबाईल टॉवरचे 5 G BASEBAND UNIT चोरी झाल्याने श्री अजयकुमार लांडगे सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी मध्यवर्ती कक्षाचे पालीस अधिकारी व अंमलदार यांचेसह गुन्हयाचे घटनास्थळास भेट देऊन गुन्हे करण्यासाठी आलेल्या आरोपींचा येण्याचा व जाण्याचा मार्गावर असणा-या सिसीटिव्ही फुटेजेसची पाहणी करीता मार्गदर्शन केले.

त्यानंतर श्री. सुनिल शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा व मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून घटनास्थळी व घटनास्थळाचे परिसरात उपलब्ध असणा-या सरकारी व खासगी उपलब्ध सिसीटिव्ही फुटेजेसची पाहणी करून तांत्रिक माहिती उपलब्ध केली.तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून गुन्हयातील आरोपीत हे मालेगाव, सटाणा व परभणी येथील असल्याचे निष्पण्ण केले. निष्पन्न केलेल्या चारही आरोपीतास एकाचवेळेस अटक करणेकामी दोन पोलीस पथकासह सापळा रचुन शिताफीने मुंबई आग्रा हायवेवर पडघा परिसरात तीन आरोपीनां ताब्यात घेतले. त्यांचेकडे केलेल्या कैशल्यपुर्ण तांत्रिक तपासवरून चौथ्या आरोपीतास सटाणा,नाशिक येथुन ताब्यात घेतला. चारही आरोपीतांस नमुद गुन्हयात दि.०८/०७/२०२५ रोजी अटक केली आहे.

**अटक आरोपीतांकडुन एम.एम.आर. मधील खालीलप्रमाणे एकुण १३ गुन्हे उघडकीस आले आहेत :-**

**<u>नवी मुंबई पोलीस आयुक्तालय</u>**

०१.खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.नं १९०/२०२५ बीएनएस ३०३ (२)
०२.पनवेल शहर पोलीस स्टेशन गु.र.नं ३८८/२०२५ बीएनएस ३०३ (२)
०३. तळोजा पोलीस स्टेशन गु.र.नं २४७/२०२५ बीएनएस ३०३ (२)
०४. तळोजा पोलीस स्टेशन गु.र.नं १४२/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**<u>मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालय</u>**

०५. मांडवी पोलीस स्टेशन गु.र.नं २३२/२०२५ बीएनएस ३०३ (२)
०६.माणिकपुर पोलीस स्टेशन, गु.र.नं २५७/२०२५ बीएनएस ३०३ (२)
०७.नायगाव पोलीस स्टेशन गु.र.नं- ३४३/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**ठाणे ग्रामिण**

०८.पडघा पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामिण गु.र.नं २६२/२०२५ बीएनएस ३०३ (२

०९.कुळगांव पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण गु.र.नं १२२/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**रायगड जिल्हा**

१०.आलिबाग पोलीस स्टेशन,रायगड गु.र.नं १२०/२०२५ बीएनएस ३०३ (२)

११.वडखळ पोलीस स्टेशन,रायगड गु.र.नं ७४/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**ठाणे शहर पोलीस आयुक्तालय**

१२.बदलापुर पोलीस स्टेशन गु.र.नं ४१९/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**मुंबई पोलीस आयुक्तालय**

१३.मानखुर्द पोलीस स्टेशन गु.र.नं ३७६/२०२५ बीएनएस ३०३ (२)

**गुन्हयात हस्तगत मुद्देमाल :-**

०१) किंमत ३२,४०,०००/- रुपये किंमतीचे JIO कंपनीच्या मोबाईल टॉवरचे 5 G BASEBAND UNIT- एकुण १२

०२) किंमत ३५,०००/- रुपये ३ मोबाईल फोन,

०३) किंमत २३,२५,०००/- रुपये किंमतीचे ३ चोरी करण्यासाठी वापरलेली वाहने असा एकुण ५६,००,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

**अटक आरोपीत नाव व पत्ता :-**

**१) मधुकर रमेश गायकवाड** वय २९ वर्षे धंदा - चालक राह. मटकरहाळा, साडेगाव, परभणी

**२) अभिषेक दिपक काकडे** वय २४ वर्षे धंदा - शिक्षण राह. मु. नवा मोंढा, इतलापुर मोहल्ला, ता. जि. परभणी

**३) सौरभ सतीश मंजुळे** वय २४ वर्षे धंदा - बेकार राह. कोळखापेट पो. ओएनजीसी ता. पनवेल जि. रायगड

**४) दानिश इर्शाद मलिक** वय २२ वर्षे रा. कसुम्बा रोड, मालेगाव नविन बस स्टॅण्ड ता. मालेगाव जि. नाशिक यांना दिनांक रोजी ०८/०७/२०२५ रोजी अटक करुन त्यांची दिनांक ११/०७/२०२५ पर्यत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली.

**अटक आरोपीत नामे मधुकर रमेश गायकवाड याची गुन्हेगारी पार्श्वभुमी :-**

१) नानलपेढ पोलीस स्टेशन, जि. परभणी गुरक्र २४९/२०२३ भादिवस ३७९,४११

२) सहकार नगर पोलीस स्टेशन,पुणे शहर गुरक्र १८८/२०२३ भादिवस ३७९

३) नवीन मोंढा पोलीस स्टेशन, जि. परभणी गुरक्र २५/२०२० म.दा.अधि. ६५ ई

तपासामध्ये अटक अरोपीत मधुकर रमेश गायकवाड व अटक आरोपी यांनी गुन्हेगारी कट रचुन **संघटीत गुन्हेगारी टोळी** बनवुण JIO कंपनीच्या मोबाईल टॉवरचे 5 G BASEBAND UNIT चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयाचे कलमामध्ये **११२ बि.एन.एस.**अशी वाढ करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. अमित काळे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.अजयकुमार लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, सपोनि तुंगेनवार (तपासी अधिकारी ), सपोनि महेश जाधव, सपोनि सचिन कोकरे, सपोनि सतीश भोसले, पोहवा/ संजय राणे, पोहवा/ अनिल यादव, पोहवा/ महेश ठाकुर, पोहवा/ नितीन जगताप, पोना/ सचिन टिके, पोना/ दिलीप ठाकूर, पोना/ राहुल वाघ, पोना/ सोमनाथ काळे, पोना/ नवनाथ पाटील, पोना/ सतिश चव्हाण, पोशि /ओमकार भालेराव, पोशि/ अशोक पाईकराव,मपोशि/पुजा वैदय यांनी केली.